# गोगलगायीचे पंख

(बाल,कुमार कविता)



सावित्री जगदाळे

लोकसंस्कृती प्रकाशन

- **प्रकाशक** -
लोकसंस्कृती प्रकाशन
प्रा. डॉ. मिलींद कसबे
वृंदावन पार्क, नारायणगांव,
ता. जुन्नर, जि. पुणे
फोन-९७६६९८४७७०

प्रकाशन क्र. – १

---

**गोगलगायीचे पंख (बाल,कुमार कविता)**

---

**© सावित्री जगदाळे**

पवन- डी- ५०५, डीएसके विश्व,
सिंहगड रस्ता, धायरी, पुणे - ४११०४१
Mo.- 9765988993
gmail – sj91087@gmail.com

---

प्रथम आवृत्ती – १.२ फेब्रुवारी २००५
दुसरी आवृत्ती – २०१२

---

मुखपृष्ठ व आतील चित्रे
**सावित्री जगदाळे**

---

- अक्षर जुळणी -
भुमी कुमठेकर, पुणे

---

मुद्रक
संपदा ग्राफीक्स
धायरी, पुणे.

---

-मूल्य -रुपये ८०/ - फक्त

निसर्गातील निरागसतेला

## •सावित्री जगदाळे याची इतर पुस्तके •

अंकुरात सजला साज (काव्यसंग्रह)

एकट पाखरा(काव्यसंग्रह )

पानमोकळ (काव्यसंग्रह)

सफर मंगळावरची (बाल, कुमारकथा संग्रह )

सहजतेने जगेन मी (कादंबरी)

फुटवा (कथासंग्रह)

गोष्टीतली बाई (कथासंग्रह)

तिचं घर (दीर्घ कथा संग्रह)

दुधाच्या मिशा (ग्रामीण बालकादंबरी )

# प्रस्तावना

**डॉ. न.म. जोशी**
१०१३ सदाशीव पेठ, गंधाली, पुणे-३०
मो. ९२२६५७५२९०

सौ. सावित्री जगदाळे
स्नेहपुर्वक आशिर्वाद
"तांबडं फुटलं" या तुमच्या कुमार बाल काव्यसंग्रहाला मी प्रस्तावना लिहावी अशी विनंती डॉ. दिलीप गरूड यांच्या द्वारा केली होती. ही तुमची विनंती मी मान्य केली, याचं कारण असं की, तांबडं फुटलं या तुमच्या साहित्यकृतीच्या द्वारा तुमच्या साहित्यिक जीवनक्रमात तांबडं फुटलं असेल तर, त्याचा साक्षीदार मला या प्रस्तावनेच्या रुपानं होता येणार आहे. आता तुम्ही या काव्यसंग्रहाच्या दुस-या आवृत्तीच्या निमित्ताने तांबडं फुटलं या ऐवजी 'गोगलगायीचे पंख' असं नाव ठेवू इच्छिता आहात. तांबडं फुटलं हे नाव चांगलं आहे. तरी मुलांच्या भावविश्वाच्या जवळ जाणारं नवं नावं 'गोगलगायीचे पंख' असं आहे. हे नाव खूपच अर्थपूर्ण आहे. गोगलगायी हा मंद चालणारा प्राणी आहे, पण महत्त्वकांक्षेचे पंख लावले तर तिलाही पंख फुटू शकतात. हा संदेश मुलांच्या दृष्टीने फार महत्त्वाचा आहे. प्रेरणादायी आहे. याच नावाची कविता या संग्रहात आहे. तीमध्ये याच भावना प्रतित झाल्या आहेत.

कष्ट करा धीर धरा
नाही कुणाला अपाय
इच्छाशक्तीने घडले चमत्कार
नाही कष्टाला पर्याय

या ओळी किती आशयघन आहेत, याचा प्रत्यय लहान थोर वाचकांना होईल. कष्ट करा आणि धीर धरा असं तुम्हाला सुचवायचं आहे. कष्ट केलं की लगेच यश मिळेलच असं नाही. तर धीर धरा. इच्छाशक्तीने चमत्कार घडलेत. आजची वैज्ञानिक प्रगती आपण पाहतो ती शास्त्रज्ञांच्या कष्टामुळे आहे. हा चमत्कार अथक श्रम, इच्छाशक्तीशिवाय कसे काय साध्य झाला असता बरं! तुम्हाला छोट्या दोस्तांना कष्टाचा हा संदेश द्यायचाय तो तुम्ही अतिशय नाविन्यपूर्ण अशा प्रतिमेत दिला आहे. म्हणूनच ही कविता महत्त्वाची आहे. पुढे

जिद्दीचे जगणे ठाम चाल
गोगलगायीला ही लागतात पंख
महत्त्वकांक्षेची गगनभरारी
गळाले पाठीवरचे शंख

आपण जर जिद्दीने, ठामपणे चालत राहून महत्त्वकांक्षेची गगनभरारी घेऊ तर, असेच आपल्या पाठीमागचे अडचणींचे लचांड आपोआप गळून पडते. हा संदेश तुमचा मोठ्यांनाही प्रेरणादायी ठरतो.

हा काव्यसंग्रह ६६ कवितांचा आहे. मुलांसाठी या वेगवेगळ्या प्रकारच्या ६६ चॉकलेटसारख्याच आहेत. हा बौद्धीक खाऊ मुलाना नक्कीच आवडेल.

बालसाहित्यातील कविता या वाङ्मय प्रकाराबाबत स्थिती अशी असते की, मुलांच्या वयोगटानुसार त्यांची आकलनक्षमता, ग्रहणशक्ती, अभिरुची बदलत असल्यामुळे वयोगटास अनुसरून तशी रचना करावी लागते.

शिशूअवस्थेतील बालकांना लयतालाच्या अनुषंगानेच कविता आवडतात. शिवाय अनुप्रासयुक्त किंवा द्विरुक्त शब्द त्यांना जास्त आकर्षित करतात. म्हणून तर "अडगुळं मडगुळं, सोन्याचं कडगुळं..." ही कविता लहान मुलांना ऐकवतात. शब्दार्थाशी फारसा सबंध नसतो.. पुढील अवस्थेत मात्र दृश्य घटक, परिसर, यातील घटक व त्यासंबंधी शब्द यांची आवड मुलांमध्ये निर्माण होते. नववी-दहावीपर्यंत काव्याशयाबाबत. मुले चांगली समजदार होतात.

या संग्रहातील काही कवितांचे असेच वर्गीकरण करता येईल. मात्र त्याचं वर्गीकरण न करता कविता आहे त्याच क्रमाने मुद्रित केल्या आहेत.

"निसर्गातील निरागसतेला" तुम्ही या कविता अर्पण के ल्या आहेत. ही अर्पण पत्रिका अत्यंत प्रयोजक आहे.

पहिली कविता 'आरती' आहे. मग येते 'नीलम परी' तिच्या पाठोपाठ आलेला 'ढंप्या ढोल' मुलांना खूपच आवडेल. अभ्यासात रमणारा तरिही खोडकर 'गुणी बाळ' मुलांना आपल्यातलाच एक वाटेल. मुले जास्ती प्रश्न विचारतात ते आईला, 'सांग ना गं आई' असं विचारून भंडावून सोडतात. अमावास्येला चंद्र कुठे जाई बाई अशी रास्त शंका या कवितेत मूल विचारत आहे. मुलांना प्राणीपक्षी तर खूपच आवडतात. मग या कवितेतील बदकाची जोडी खुणावत आहे. या कवितेत ताल, लय यात मुलांना गुंगवून ठेवतात.

तुमच्या या बालगीतांमध्ये कोंबडीचं, क्वॉक क्वॉक आहे. कावळ्याची, काव काव आहे. ताईचं निसर्गचित्र बघताना निघालेले आश्चर्योद्गार अबब ~! आहेत. बालपण या कवितेत बालपणाची सगळी बागडमस्ती छान छान शब्दात व्यक्त केली आहे.

दिवसभर हुंदडत बागडत ...<br>
बॅट फिरवून फुशारकी मारत...<br>
वाहत्या पाण्यात रपारपी खेळत...<br>
धापा टाकून खात खात...<br>
दंग होऊन मग स्वप्नांच्या राज्यात<br>
आईच्या कुशीत झोप घेत...

बाळाचा सगळा दिनक्रम प्रत्ययकारी रितीने या कवितेत मांडला आहे. 'Childhood is nothing but God's gift to humanity ' या प्रंसिद्ध आंग्लकवी शेलीच्या ओळींची आठवण ही कविता वाचल्यावर होते.

मुलांच्या आवडीनिवडी, त्यांचे स्वभावविशेष, त्यांच्या वागण्यातील विविध रंगछटा निरनिराळ्या कवितांतून व्यक्त झाल्या आहेत. मुलांना शाळेमध्ये न्यावा लागतो. डब्यात काय द्यायचं असा प्रश्न मुलांच्या आईला नेहमीच पडतो. शाळा तर नेहमीच सांगते ..डब्यात पोळीभाजी द्या. आणि मुलं म्हणतात, रोज पोळीभाजीच का? हे

घरोघरीचे संवाद आहेत. 'मस्त भाजी' या कवितेत मुलांच्या मनातील भाजी तुम्ही छानच उघड केली आहे.
सावित्रीताई, काही काही कवितांमधून मात्र तुमची बालकवी ही भूमिका अलगद सुटून जात आहं आणि तुम्ही मोठ्यांच्या राज्यात सहजी प्रवेश करत आहात. असे वाटते. मुलांना न झेपणा-या तरल संवेदना... त्या कितीही चांगल्या असल्या तरी ...तुमच्या कवितेतून मोठ्या प्रमाणात डोकावतात. उदा: 'गारवा' ही संपूर्ण कविता. ही कविता काव्यसौदर्यानं ओथंबलेली आहे पण मुलांना ती पेलेल का? गारव्यात झुले मनाचा झुला / पानापानात घुमे गार वारा... अशा कल्पना मुलांना पेलतील? तीच गोष्ट काही शब्द आणि संकल्पना या संज्ञा याबाबतची, कोंबडी हा पक्षी मुलांना आवडतो. पण त्याच्या डोईवरच्या तु-याचे वर्णन करताना त्याला कलात्मक हा शब्द तुम्ही योजला आहे. मुलांना सुंदरता समजते पण कलात्मकता समजण्याचे त्याचे वय नसते. संत गाडगेबाबांचे वर्णन करताना, 'मनाचे साधुत्व' जनकल्याणार्थ खर्चले आयुष्य, त्यांच्या भावात ज्ञानाचे अखंड पाझर, वाहतात तृषार्ताकडे, घ्या ओंजळीने भरभरून... अशा संज्ञा तुम्ही देत आहात मुलांना या संज्ञा व त्यामागील अर्थ संकल्पना पेलणार आहेत का?
अशा कविता या बालगीतसंग्रहात विशोभित दिसतात. तुमच्या या कवितासंग्रहाची अनेक बलस्थाने आहेत.

**पहिलं बलस्थान म्हणजे या संग्रहाच्या रूपाने मुलांना हाती माहितीचा खजिना लागणार आहे!**

पक्षी, प्राणी, वस्तू, स्थळे यांबाबत खूप माहिती आहे.

**दुसरं बलस्थान म्हणजे वर्तमानातील प्रतिमांचे संयोजन तुम्ही या कवितांमध्ये उत्तम रितीने केले आहे!**

उदा: 'आजीच्या वेळी' या कवितेत ... काय दिवस आलेत बाई/
सगळीकडेच रांगा न् पाळी... यावेळी पाहुणे होते, आता कुत्र्यांची सरबराई चालते...

**तिसरं बलस्थान म्हणजे निसर्ग चित्रण!** अनेक कवितांमध्ये निसर्गाची विविध रुपे रंगरंगोटीसह रंगवली आहेत.

**चौथे बलस्थान म्हणजे बालसुलभ विषयांची शिंपण आणि गुंफण!**

तुम्हाला बालमन चांगले वाचता येते, याचा जागोजागी प्रत्यय येतो. या कविता संग्रहाचे स्वागत शिक्षक, पालक, बालक, मुलांच्या क्षेत्रात काम करणा-या संस्था, ग्रंथालये यांनी अवश्य करावा अशी मी शिफारस करतो कारण असं लेखन वाचूनच आपली मनं समृद्ध होणार आहेत. वाचनाचे बालमनावर संस्कार होणार आहेत. बालवाचक प्रगल्भ होणार आहे. मराठी वाचणा-या प्रत्येक मुलाने हे पुस्तक वाचावे असं माझं मत आहे. **या पुस्तकात चित्रेही आहेत. ती रंगवावीत**. बालमनाच्या कल्पनेला रंगीबेरंगी गोगलगायीसारखे पंख फुटतील. तुमचं हे काव्यशिल्प 'गोगलगायीचे पंख' वाचकांसाठी सादर करतो.

**डॉ. न. म. जोशी**

# मनोगत

दोस्तांनो,

मला वाटतं, आपल्यापेक्षा जे वयाने छोटे आहेत, त्यांच्यासाठी काहीतरी करावे. जे माझ्यासाठीही आवश्यक असतं, जसं मुलांना घेऊन बागेत जाणं हे मुलांप्रमाणे मोठ्यांनाही आवश्यकच असतं! परंतु मुलांच्या निमित्ताने बागेत जाणं घडतं एवढंच. तर काय, काहीतरी करण्यामुळे आपल्या सर्वांचेच काही क्षण आनंदी, उत्साही होतील. मोठी माणसं नेहमीच उपदेश करतात मग जाम कंटाळा येतो नाही? पण हेच गमतीजमतीनं, हसतखेळत सांगितलं तर मजा येते, असं आपलं मला वाटतं. आजची मुलं खूप हुशार, चतुर म्हणजे स्मार्ट, टॅलेंटेड वगैरे आहेत. सगळं कळतं हं तुम्हा मुलांना! पण हुशारी, प्रतिभा, टॅलेंट टी. व्ही. पुढे बसून, सतत गेम खेळून गंजवू नका. लागलात ना बोअर व्हायला! असं काही कोणी सांगायला लागलं की चिडून उलटंच करावंसं वाटतं. आलं लक्षात. तरीपण चांगल्या गोष्टी सांगाव्याशा वाटतात. हे वाढत्या वयाचं लक्षण आहे. काय करणार! तुमचं आयुष्य सुंदर व्हावं असं सारखं वाटतं, आणि मग सांगितल्याशिवाय राहवत नाही.

छोट्या दोस्तांनो, एकदा मतिमंदांच्या शाळेत जाऊन पाहा, म्हणजे कळेल आपल्याला, निसर्गाने दिलेलं हे बुद्धीचं लेणं किती अनमोल आहे. रिमांड होम, अनाथाश्रम इथल्या मुलांना भेटून, गप्पा मारा त्यांच्याशी. मग तुम्ही वडीलधाऱ्या माणसांवर नाराज होणार नाही. मोठी माणसं जे सांगतात ते आपल्या हितासाठीच आहे, हे तुम्ही समजून घ्याल. केव्हातरी मुक- बधीर, अंध - अपंग मुलांशी बोला. शक्य झालं तर दोस्ती करा त्यांच्याशी. मग जाणवेल तुम्हाला धडधाकट शरीराची श्रीमंती. या दैवी देणग्या जपाव्या लागतात. त्यांचे संवर्धन करावे लागते, हे नक्कीच उमजेल तुम्हाला. कष्टाने भाग्य उजळते हे तुम्हाला याआधीच माहित आहे. आणखी सांगण्याची काय जरुरी आहे? तुम्ही एकविसाव्या शतकातील जिज्ञासू मुलं आहात. उज्ज्वल भारताचे नागरिक आहात. आपल्या मातृभुमीचे भाग्यविधाते आहात. मग काय! ठरवलंत ना? रोज नेमानं व्यायाम करायचा. सारखंसारखं टी. व्ही. पुढे न बसता अवांतर वाचन करायचं. पुस्तक वाचण्यामुळे ध्वनीप्रदुषण, हवाप्रदुषण होत नाही. दुसऱ्यांना त्रास न देता आपण वेगळ्या दुनियेत सफर करू शकतो.

चांगले लेखन आपल्याला भावते, आवडते, मनात रुतून बसते. मेंदूत ठसून बसते. मग आपला मेंदू आपोआपच तसा विचार, मनन, चिंतन करायला लागतो. मग आपल्यालाही सुचू लागते. आपल्या मनातले भाव, तरल भावना, खळबळ, राग, द्वेष हे व्यक्त करण्यासाठी योग्य शब्द माहीत असायला हवेत. शब्दांच्या वेगवेगळ्या छटा आपल्याला वाचनामुळेच कळतात. वाचनामुळे मेंदूत शब्द फिड होतात. हव्या त्या वेळी हवे शब्द जिभेवर सहजतेने येतात. यासाठी वाचनाला पर्याय नाही. पुस्तकांबरोबर मानवी चेहेरेही वाचायला शिका. हे मात्र तुम्हाला दुसरे कोणी शिकवणार नाही. तुमचे तुम्हालाच शिकावे लागेल. चेहेरे वाचण्याची कला उपजतच असते. छोट्या, निरागस मुलांचे निरिक्षण करा, त्यांना लगेच कळते कोण रागीट- खडूस आहे, कोण प्रेमळ - मायाळू आहे. हिडीसफिडीस

केले की पुन्हा जात नाहीत त्या व्यक्तीकडे. निरिक्षणाने मानवी चेहेरे वाचता येतात. देहबोली कळते.

एखाद्याच्या हातून वारंवार चुका घडतात, त्याला रागे भरण्याआधी त्याच्या जागी मी असेल तर... हा विचार करा. दुसऱ्यांच्या भावना समजू शकाल तुम्ही. निसर्गाचं निरिक्षण करा. तुमच्यातलं कुतूहल, जिज्ञासा जागी ठेवा. ही सृष्टीची वेबसाइट उघडता आली तर ब्रम्हांडाचं ज्ञान, माहिती सहज मिळवता येईल. आता एवढं सगळं करायला वेळही भरपूर पाहिजे. स्टॅमिना पाहिजे. स्टॅमिना टिकवण्यासाठी आरोग्य चांगलं पाहिजे. वेळही वाचवता यायला हवा. मग टी. व्ही. बघणं, गेम खेळणं उगाचच लोळत राहणं हे टाळायलाच पाहिजे.

आपल्यात जी बुद्धीमत्ता आहे तिचा जास्तीत जास्त वापर करायला शिका. पण कसं? खूप वाचा. तुम्हाला कळेल काय करायचं ते. पुस्तक हा आपला चांगला मित्र असतो, चांगला गुरू असतो, हे तर सगळ्यांनाच ठाऊक आहे. म्हणून वाचणं गरजेचं आहे. वाचण्याला पर्याय नाही. खूप वाचा आणि हुशार व्हा.

आता उपदेशाचा कंटाळा आला असेल ना? पण काय करू अजून सांगून संपलेलं नाही. माझ्या या कविता लिहिल्यावर मी त्या माझ्या मुलांना वाचायला देते. मुलं काही सूचना करतात. सकाळमधील 'चिंटू' हे सदर वाचतावाचता कितीतरी कविता सुचल्या आहेत. असं नेहमी सतर्क सजग राहिलं तर आपल्याला चांगलं काहीकाही सुचत राहतं. आपल्या हातून चांगलं काहीतरी झालं तर आयुष्य सार्थकी लागेल. चांगल्या, विधायक गोष्टींची चटक स्वतःला लावायची. वाईट गोष्टी आपोआप दूर पळतात.

दोस्तांनो आपल्याला खूप काही करायचं असतं ना, तेव्हा दिवस भराभर संपतात. आयुष्य फार कमी आहे असं वाटतं. म्हणून वेळीच सावध होऊन वेळेचे महत्त्व जाणायला हवं. फुकट टाइमपास करायची सवय मोडायलाच हवी, नाही का? कामात बदल केल्याने मेंदूला विश्रांती मिळते. जेव्हा वाचून कंटाळा येतो तेव्हा शारीरिक काम करा जसं घरातली साफ सफाई, कपडे धुणं, भांडी घासणं, एखादा पदार्थ करणं. घरातलं कितीही काम केलं तरी संपत नाही. म्हणून कंटाळा येतो. आई उगाच चिडचिड करत नाही! मनापासून करत राहिलं तर त्याचीही गोडी सर्वोत्कृष्ट कला लागते. तरी घरातलं काम करावंसं वाटलंच नाही तर फिरायला जा. गाणी ऐका. गायन हीआहे. इतर वाद्येही वाजविता आली उत्तमच. आपल्याला खूपच बोअर व्हायला लागलेय आणि बाहेर जाणं अशक्य आहे, असतात ना अडचणी बाहेर. जसं, कडक ऊन असणं, बर्फ पडणं, खूप जोराचा पाऊस, वादळवारा असणं कर्फ्यू लागणं, बंद असणं, दंगे होणं असं कितीतरी कायकाय चाललेलं असतं आपल्या अवतीभवती, परिसरात, शहरात. अशा वेळी गायन, वादन, वाचन लेखन आपल्या उपयोगी पडते. गाण्याबजावण्यामुळे आपण दुसऱ्यांनाही आनंद देऊ शकतो. असं सारखं काहीना काही करत, शिकत राहा.

स्वयंपाक ही कला तर आपल्या जगण्याशी निगडीत आहे. छानसा पदार्थ करून खायला घातला तर एखाद्याचं मन जिंकता येतं. रिडीग, रायटींग, कुकींग या गोष्टी आपल्याला यायलाच हव्यात. यात मुलगा - मुलगी भेद न करता शिका. परिस्थिती जेवढी प्रतिकूल तेवढं आपलं शिकणं जास्त. बुद्धीला धार जास्त. मग आपली बुद्धी उठेलही झळाळून. चंदन ओलं करून उगाळलं की सुगंध बाहेर

पडतो. तसे आपले विचार कारूण्यात भिजवून परिस्थितीच्या सहानेवर घासावेत. मुलांनो, फारच बोअर व्हायला लागले ना? जाऊ द्या, माफ करा. तुम्हाला एक आठवण सांगते (लिहिते).

माझे गाव (माहेर) बारामती तालुक्यातील मेखळी हे आहे. मेखळीत आमचा खूप जुना वाडा आहे. वाड्याचं छत पत्र्याचं आहे. उतरत्या पत्र्यालगत कमी उंचीवर सोपा (पडवी) आहे. त्याच्याशेजारी तुळशीवृंदावन आहे. सोप्याच्या पत्र्यावर चढून जायचं असलं की तुळशीवृंदावनावर पाय ठेवून, लहानथोर वर जायचे. बायका वाळवण वगैरे घालायच्या. आम्ही मुले, काही खेळ, पतंग उडवणे यासाठी जायचो.माघ महिन्यात प्रथमेपासून ते सप्तमी (रथसप्तमी) पर्यंत सूर्यनारायणाचे उपवास करतात. माझी आई, चुलती, वहिनी, शेजारी पाटलाचा वाडा आहे. त्यांच्या वाड्यातील कमलमामी, पुष्पामावशी या सर्वांचे सूर्यनारायणाचे व्रत असायचे. पाटलाचा वाडा कौलारू असल्याने त्यावर फारसं काही काम करता यायचं नाही. मग मामी आणि मावशी आमच्या पत्र्यावर यायच्या. रोज तांबडं फुटताना अंघोळ करून, पूजेची तयारी करून आम्ही पत्र्यावर जायचो. आम्हा लहान मुलींचे व्रत नसायचे तरी आम्हाला ते फार आवडायचे, म्हणून आम्ही जायचो. पूर्वेकडे आभाळ केसरी, जांभळट, गुलाबी, लाल अशा रंगांची उधळण करत असे. रेडिओवर सात पाचच्या बातम्या सुरू झाल्या की पूर्वेकडे आकाशात लालतांबूस सूर्याचा गोंडा हळूहळू वर यायचा. सूर्याचा केसरी ठिपका दिसला की, पुष्पामावशी म्हणायची, 'आकाशवाणी पुणे, सुधा नरवणे बातम्या देत आहेत.' असं म्हणून हसायची. आणि तेच रेडिओवर रिपीट व्हायचे. तर असे ते सात दिवस उत्साहाचे असायचे. रथसप्तमीदिवशी सूर्याचा रथ काढून त्यावर छोट्या गुंडगीतून दूध ऊतू घालवायचे. गुंडगी गरम करण्यासाठी चुलीतला विस्तव रथाजवळ ठेवायचा गुंडगी गरम झाली की त्यात दूध घालायचे ते शक्यतो पूर्वेकडे ऊतू जाईल तर शुभ मानायचे. म्हणून मग ती गुंडगी पूर्वेकडे कलती ठेवायची. मग दूध तिकडेच सांडायचे. रोज तांबडं फुटलं की दिवसाचा आरंभ होत असे. आता उंच इमारतीमुळे सूर्योदयाचे दर्शन दुर्मीळ झालंय. म्हणूनच हे लहानपणीचे 'तांबडं फुटणं' मनातून जात नाही. एकविसाव्या शतकाचा आरंभ म्हणूनही 'तांबडं फुटलं' असं पुस्तकाला नाव दिलं आहे.

दुसरी सुधारीत आवृत्ती काढायचं ठरल्यावर नावही बदलावं म्हटलं. मुलांना आवडेल, रुचेल असं नाव द्यावं वाटलं. हे नाव तुम्हाला वेगळं वाटेल, अशी अपेक्षा आहे.

**मित्रांनो काहीही शंका आल्यास, सूचना करावीशी वाटल्यास, काहीही सांगावंसं वाटल्यास पत्र पाठवा, फोन, अथवा मेल करा.**

सावित्री जगदाळे
पवन- डी- ५०५, डीएसके विश्व,
सिंहगड रस्ता, धायरी, पुणे - ४११०४१
**Mo.-9765988993 / E-mail: sj91087@gmail.com**

# अनुक्रमणिका


१. म्हणावी पाठ आरती ........ १२
२. निलम परी ........ १३
३. ढंप्या ढोल ........ १४
४. कढीपाल्याचे खमंग रोप ........ १५
५. बाळाची वाढ ........ १६
६. गुणी बाळ ........ १७
७. धोंडू फुला ........ १८
८. सळसळते चैतन्य ........ १९
९. हॅपी बर्थ डे ........ २०
१०. घरची शाळा ........ २१
११. सांग ना गं आई ........ २२
१२. वाढू दे जाणिवा ........ २३
१३. नको प्राणी संग्रहालय ........ २४
१४. बदकाची जोडी ........ २५
१५. जय जवान ........ २६
१६. हसू गालात नृ... ........ २७
१७. कोंबडी ........ २८
१८. ताईचं निसर्ग चित्र ........ २९
१९. बालपण ........ ३०
२०. मस्त भाजी ........ ३१
२१. डॉक्टरदादा ........ ३२
२२. एक पान हलत डुलत ........ ३३
२३. शुभाशीष ........ ३४
२४. गारवा ........ ३५
२५. काय करावे ........ ३६
२६. तरुलता ........ ३७
२७. चिंटूची बॅटिंग ........ ३८
२८. सालभर दिवाळी ........ ३९
२९. चांदोमामा ........ ४०
३०. मनी बांधतोय घाट ........ ४१
३१. उल्केचा वर्षाव ........ ४२
३२. लोणार ........ ४३
३३. स्वप्नसुत ........ ४४
३४. टिंकूची सायकल ........ ४५
३५. काजवे ........ ४६
३६. घे तू थांग ........ ४७
३७. सुवर्णपदक ........ ४८
३८. मामाच्या गावाला ........ ४९
३९. नवे युग ........ ५०
४०. इवलेसे घरटे ........ ५१
४१. आत्याचा वाढदिवस ........ ५२
४२. अभ्यासू ........ ५३
४३. रोहितची दुर्बिण ........ ५४
४४. का? ........ ५५
४५. सुट्टी ........ ५६
४६. माझे बांधव ........ ५७
४७. पाणी अडवा पाणी जिरवा ........ ५८
४८. संत गाडगेबाबा ........ ५९
४९. झाडांना ओढ आकाशाची ........ ६०
५०. घरकाम ........ ६१
५१. गोगलगायीचे पंख ........ ६२
५२. साध्य करू... ........ ६३
५३. चांदणी दिवे ........ ६४
५४. आजीच्या वेळी ........ ६५
५५. माझे आजोबा ........ ६७
५६. पृथ्वीचे मनोगत ........ ६८
५७. आपलंच झोपडं बरं ........ ७०
५८. दवबिंदू ........ ७१
५९. स्वप्नाळू डोळ्यांचा दादा ........ ७२
६०. सणासुदीचा वर्षाव ........ ७३
६१. चांदण्यांचं राज्य ........ ७४
६२. लेकीची दहावी ........ ७६
६३. परीक्षा ........ ७७
६४. मामाला माझ्या ........ ७८
६५. उठा ऽ उठा ऽ रे ........ ७९
६६. जय शिवाजी ........ ८०

# म्हणावी पाठ आरती





गणेशजीची मूर्ती सुंदर
रोज चाले आरतीचा गजर



भरगच्च सजावट दिव्यांची
आरास पडदे तोरणांची

हिरवे हिरवे दुर्वांकूर
गोड गोड गव्हाची खीर

कळीदार उकडीचे मोदक
नजर झाली शोधक

निरांजनाच्या दोन वाती
कापूराच्या सुगंधी ज्योती

गोल गोल ओवाळीता ताटा
घण् घण् वाजे घंटा

सर्वांनी केली पाठ आरती
गणरायांची वाढेल प्रीती

# निलम परी



स्वप्नात आली एक परी
होती खूपच सुंदर गोरी

पंख तिचे चमचम चंदेरी
झगा कसा शुभ्र भरजरी

तिने दिली मला एक दरी
म्हणाली मार आकाशी भरारी

उंच गेलो निळ्या अंबरी
नजर खाली भुईवरी


दिसते कशी सुंदरी
ही तर माझी निलम परी

दरी दरी ने मला धरतीवरी
हिरवी निळी सुंदर माझी परी

जाऊ दे लवकर तिच्या कुशीत
मायेची ऊब तिच्याच मातीत

झपंकन आली दरी जमिनीवर
अन्... मी आदळलो फरशीवर

# ढंप्या ढोल



पान हलतंय लुटूलुटू
बाळ बघतंय टुकूटुकू

पानांचा आवाज सळसळ
पाणी वाहातंय खळखळ
छताला लटकलंय मोठं डूल
नंदीबैलावर पांघरली रंगीत झूल



झऱ्याचं पाणी झुळझुळ
पाखरांची गाणी मंजूळ मंजूळ

डब्यात पैसा खुळखुळ
बाळाच्या वाटीत दाणे न् गूळ

दुडूदुडू धावताना जातोय तोल
पुटूपुटू पडताना डोळ्यात ओल

ढंप्या ढोल गंप्या गोल
बोबडं बोबडं बंट्या बोल

# कढीपाल्याचे खमंग रोप



कढीपाल्याचे रोप नाजूकवाणी
कुंडीत लावले अंगणी

गडद हिरवा रंग पानोपानी
पोपटी पालवी गोजिरवाणी

एकेका फांदीची चढती भाजणी
हिंग-ताकाचे त्याला पाणी

येईल मग बहरुनी
भरलीय रुची त्याच्या पानोनानी

सैपाकात लावील वर्णी
खमंग होईल आईची फोडणी

तोंडा सुटेल सर्वांच्या पाणी
अंगत पंगत रंगली अंगणी

बाबांनी वाढले आग्रह करुनी
पोट भरले आमटी भुरकुनी

# बाळाची वाढ

उंच करतोय छाती
हातावर देतो भार
झेपेना डोकं ढळतेय मान
इकडे तिकडे बघताना

आवाजाकडे देतोय कान
चिंडूकलं हसतो बोळकं वासतो

माणसं बघून खदखदून हसतो
कागद चुरगाळतो दुपटी चघळतो

दुधाला नकार  मुठी चोखतो
पालथं पडून पुढं सरकतो

मागे जातो गोल गोल फिरतो
जमिनीवर हात आपटतो

बाळाला वाटतं उठून पळावं
कडेवर घेऊन सारखंच फिरावं



# गुणी बाळ

खेळ खेळतो सैनिकाचा
लेफ्ट-राइट परेड करतो
तोंडाने बंदुकीचा ठोऽठोऽ
आवाज काढीत असतो

कागदाचे विमान करीत
हवेत भिरकावितो
शाळेत जाईन यामध्ये
बसून म्हणीत असतो

जेव्हातेव्हा हातवाऱ्यांनी
बॉलींग करीत असतो
हातात नसली बॅट तरी
घरातच क्रिकेट खेळतो

मैदानावर फुटबॉल खेळता खेळता
घराचे मैदान करतो
ताईची खोडी काढता काढता
स्वत:च रडत असतो

दुसऱ्यांची कागाळी करता करता
हळूच हसत असतो
दंगामस्ती चाले दोघांची
सारे घर डोक्यावर घेतो

दमुनभागून पळत घरी
धापा टाकीत येतो
भूक भूक करून
आरडाओरडा करतो गुणाचा बाळ थोडे खाऊन
अभ्यासात रमतो

# धोंडू फुला

धोंडू फुला
काय झालं तुला

का रे रडतोस मुला
हवंय काय तुला

आई तुझी करते काम
खेळत राहा ना छान छान

किरकिर तुझी सदा रे
पोटावर पोहतो हवेत रे

हात उभारून झेपावतो
घे घे तोंडाने चालू करतो

कडेवर घेता येतं हसू
कुठं जातं तुझं रडू

बाळाला आवडतो
गोड गोड शिरा

पितो भाताची पेज
झालाय जरा किरकिरा

धोंडू बाळ हुशार फार
नाकाला लागलीय शेंबडाची धार

# सळसळते चैतन्य



दुसऱ्यांना घडविताना स्वतःच
घडलं पाहिजे अधिक

ज्ञानाचा घडा करताना रिता
पाझर फुटतील अधिकाधिक

रात्रंदिन परीक्षाच देत राहायैचे

पहिले येण्याची अपेक्षा नसली जरी

धडपड करीत राहाण्यातच

जीवणाचं श्रेय सामावलं आहे


सुस्त आळशी जिणं
नको गांडुळासारखं
चुस्त उत्साही जगणं
असावं नागराजासारखं

आत्मविश्वासाने फुत्कार टाकीत
बेडर असावी चाल
कोण येता चांगल्या कामात आडवे
त्यास डंख मारीत जाल

नाही भय दुनियेचं
नाही मरणाचं
जगणं असो हे
सळसळते चैतन्याचे

# हॅपी बर्थ डे

हॅपी बर्थ डे टू यू
हॅपी बर्थ डे टू यू



लागले सगळे टाळ्या पिटू
चला चॉकलेट सर्वां वाटू

खूश आज पिलूची स्वारी
आनंदाने पाहा कसा बहरी

संध्याकाळ ही हसरीहसरी
बागडती ही बालके गोजिरी

लेवूनी कपडे भरजरी भारी
दिसती कशी सुरेख साजरी

निरागस हास्य फुलले आज
घरादारावर चढला साज

सख्यासोबतींनी घर भरले
छान सजावट सुंदर सजले

कोलांट्या उड्या दंगामस्ती करी
कुणीही ना रागावती तरी

आनंदाचा कल्लोळ उसळला
चिवचिव किलबिल सागर फेसाळला

दीर्घायुष्य लागावे राजा तुज
ईशचरणी प्रार्थना हीच आज

# घरची शाळा

रोजच शाळेत जायचं
आईला सोडून दिवसभर राहायचं

स्वतःच डबा उघडून खायचा
घरचा अभ्यासही लिहून काढायचा

आईची कित्ती मज्जा असते
तिला कुठे जायची घाई नसते

आम्हाला शाळेत हाकलते
आपण घरात निवांत बसते

वाटतं रोजच असावी सुट्टी
मग आईशी जमेल गट्टी
घरीच भरावी शाळा
भिंतीवर कापडी फळा

बाबा शिकवतील गणित इंग्रजी
आई घालेल पाढे गाणी
ताई सांगेल नकाशातील गमती
दादा घेईल करून पक्की भूमिती

शूर शिवाजीचा वाचून इतिहास
देशसेवेचा घेईन ध्यास

गांधीजींचे स्वावलंबन
करीन त्याचे घरीच पालन

नको रिक्षात बसायला कोंबून
शाळेत दाटीवाटीनं अवघडून
घरीच असावी अशी शाळा,
भिंतीवर टांगलेला कापडी फळा

# सांग ना गं आई

सांग ना गं आई'
तांबडं फुटलं म्हणजे गं काय

रात्र संपते पहाट होते
आकाश होते केसरी गुलाबी
जणू फुटलंय आभाळ
झालंय तांबडं लाल

सांग ना गं आई
सूर्याला ग्रहण कसे लागते बाई

सूर्य आणि पृथ्वीच्या
मध्ये येतो चांदोमामा
सावली पडते पृथ्वीवर
त्यालाच म्हणतात लागले ग्रहण

सांग ना गं आई
अमावस्येला चंद्र कुठे गं जाई

सूर्याबरोबर उगवतो
चंद्र असतो आकाशी
अंधारी बाजू पृथ्वीकडे असते
म्हणून दिसत नाही डोळ्यांशी

सांग ना गं आई....

# वाढू दे जाणिवा



वाढदिवस आज सानुल्याचा
हर्षभरला दिस आनंदाचा
नवनवीन योजना आखतो

सखेसोबती अनेक जोडतो
जुन्यांचीही आठवण ठेवितो

उत्साहाने अती ओसांडितो
चोहिकडे तोषचि सांडितो

पसंतीस उतरलेला पोशाख
वर्णावा काय त्याचा दिमाख

निरंजनाने करिता औक्षण
चमकतात हसरे नयन

औक्षवंत हो रे माझीया बाळा
माझेही आयु लाभू दे तुजला


वयासोबत वाढू दे जाणिवा
नकोच काढू कुणाच्या उणिवा

नको करू कुणाची उपेक्षा
ठेवू नको कशाची अपेक्षा

अपयशाच्या सोसताना झळा
भोवती फुलव मायेचा मळा

त्यागातून उमलू दे आयुष्य
निरामय मिळेल दीर्घायुष्य

# नको प्राणी संग्रहालय



वनराजासाठी नाहीत वने
म्हणून ठेवलंय पिंजऱ्यात
अस्वस्थ शक्तीशाली तो
लोक मात्र गुंग रंजनात
सचेतन देहाला
अचाट चैतन्याला
एक संग्रहालय?
मुक्ती फक्त माणसाला?


केविलवाणा प्रचंड देह
डोळ्यात कारुण्य
माणसाच्या क्रुरतेचे
हेच सिद्ध प्रमाण!

नको नकोच ते प्राणीसंग्रहालय
हवंच आता प्रत्येकाला अभयारण्य

# बदकाची जोडी

डुलत डुलत
चाल झुलत झुलत
वल्ह्यासम पाय गुलाबी
चालताना गवताची सळसळ

उडतात किडे थरकून
चोचीने पकडत भरकन



खात खात
पाण्यात जाई
पोहत पोहत
मासळी खाई



चोच गुलाबी
नजर गिर्रेबाज

वळविती माना
तिरक्या ऐटबाज

शुभ्रधवल जोडी
सुंदर बदकांची

दिसती मोहक
देखणी सुरेख

डुलत डुलत
चाल झुलत झुलत

# जय जवान



जवान रक्षिती सीमा देशाच्या
जिवावर होऊनी उदार

नातीगोती विसरून सारी
उदक सोडिती जगण्यावर

गाजविली मर्दमुकी या वीरांनी
घातकी शत्रू अन् घुसखोर

पळता भुई करीत त्यांना
नामोहरम झाले शिरजोर

पडले धारातिर्थी सोडविताना
ह्या मायभूच्या जळवा

ध्येय त्यांचे एकच ध्यासही तोच
शत्रुला हाणा मारा कापा पळवा

जय जवान जय जवान
आयुष्य तुमचे महान

# हसू गालात न्...



माती लागली अंगाशी
गंमत, खेळ खेळता मित्रांशी


आईने का मारावेत फटके
हुंदक्यावर आले हुंदके

आई कसली वाईट्टली
नुसतीच मारीत सुटली

ताईने दाखविली जंमत
हसू गालात न् पाणी डोळ्यात

बाळाची कळी खुलली
स्वारी आईच्या गळ्यात पडली

# कोंबडी



क्वॉक क्वॉक करिती कोंबडी
घट्ट पकडता तिची तंगडी

मोकळे राहिले तिचे पंख
तोंडाने करते नुसता शंख

पंखाची फडफड वरखाली
सुटण्याची धडपड क्षणोक्षणी

कोंबडीच्या डोक्यावर सुंदर मुकुट
नाजूक शोभिवंत कलात्मक

दिसते पाहा कशी सुंदर
सोडा तिचे पाय लवकर

मारील चोच मुखावर
पाडील खोक खोलवर

क्वॉक क्वॉक करिती कोंबडी
घट्ट पकडता तिची तंगडी

# ताईचं निसर्ग चित्र



लाल लाल कौलारू घरे
हिरवे गार शेजारी मळे

अबऽबऽ भले मोठे वडाचे झाड
काही कळेना पारंब्या की खोड

लालभडक गुलमोहर पिवळाजर्द बहावा
पळस फेकतो आगीच्या ज्वाळा

करंजाच्या शुभ्र कळ्यांचा पडला सडा
कडूसर वास येतोय ना थोडा थोडा

माड निघालेत उंचच उंच गगना
झावळ्यांनी पालवतात सूर्यकिरणांना

रखरखीत डोंगरावर झाडांचे खर्राटे
ताई चित्रात मारतेय फर्राटे

# बालपण

दिवसभर हुंदडत बागडत
टाकूनी चेंडू फिरवूनी बॅट फुशारकी मारीत

कधी रंगात येऊनी खेळे लपाछपी
वाहत्या पाण्यात चाले रपारपी

धावत पळत येऊनी पाणी पितसे ढसाढसा
धापा टाकीत बसूनी खातसे कसाबसा

मन भरून खेळून वळतो अभ्यासाकडे
मोठ्याने म्हणत कविता पाठ धडे

अखंड धावपळ आला शिणवटा
अनावर झोपेच्या थोपवेनात लाटा


मिटू लागल्या नयनपाकळ्या भराभर
अथक भिरभिर भिरणारे ते नेत्रभ्रमर

अडकले पापण्यांच्या दलात अलगद
आईच्या कुशीत झोपला बाळ शांत

दंग असे स्वारी स्वप्नात
भटकण्या जाई परीराज्यात

क्षणात विलसे स्मितहास्य ओठात
निरागसता फुलते गोड चेहऱ्यात

# मस्त भाजी




आई मनात म्हणाली
गंमत करते आज सोनूची

पालेभाजीला शिवत नाही
डब्यात घालत भाजी शेपूची

नकळत कळले गुपित सोनूला
मित्राच्याही डब्यातल्या भाजीचे

हुशारीने केली अदलाबदल
फस्त केले दोघांनी डबे जेवणाचे

रिकामा डबा पाहून
म्हणते कशी आई




सोनू, भाजी संपवली
शहाणं माझं बाळ बाई

अगं आई मित्र माझा
खराखुरा सच्चा दोस्त

खाऊन माझा डबा म्हणाला
तुझ्या आईनं भाजी केलीय मस्त

# डॉक्टरदादा

डॉक्टरदादा
आला सोलापुराहुनी
आवडली तुमची नगरी
म्हणे आनंदुनी



थंडावले नयन तयाचे
कोल्हापूर पाहुनी
औषधाऐवजी आणली
खाऊ न् खेळणी

भली मोठी किटकॅट
की - चेन मजेदार

हाडांच्या सापळ्याची
पाहून पडलो थंडगार

डोळ्यावर चष्मा
बघतो निरखुनी

हातपाय धूत जा स्वच्छ
आल्यावर बाहेरुनी

नको घालू तोंडात बोटे
नखे वाढवुनी

होतील पोटात जंत
गांडुळावानी


फक्त आजचा दिवस
खा कॅडबरी

मात्र नेमाने रोज
दोनवेळा ब्रश करी

अभ्यास कर चांगला
मोठा हो

सांगुनी लगेच
गेला की होऽ

# एक पान हलत डुलत



एक पान हलत डुलत
माझ्याशी मजेने खेळत
ना...ना...हो...हो...करत
गप्पा आमच्या छान चालत

सूर्यकिरणे येतात बागडत
वारा येतो झुलत झुलवत

पाखरांबरोबर शीळ घालत
गाणी त्यांची ऐकत ऐकत

चांदोबाची गंमतजंमत
ढगांची शिवाशीव पाहात

वीज झळकते दणकत
आभळी फटकारे मारत

पावसाचे हात अनंत
मायेने चिंब भिजवत



एकाच ऋतुचे आयुष्य जगत
वाढत वाढत पान ज़ाते पिकत

पालवीला करून मोकळी जागा
गळून पडते झाडाच्या नकळत

एक पान हलत डुलत
माझ्याशी मजेने बोलत...

# शुभाशीष



सोनियाचा दिवस आनंद मजेचा
वाढदिवस आज माझ्या ज्योतीचा

आई करेल गोड गोड खाऊ
का घालील पाठीत धम्मक लाडू

नाना म्हणतील हवा कशाला ड्रेस
अशीच दिसतीस सुंदर बेस

ताई काढील बारीक चिमटे
म्हणेल हॅपी बर्थ डे बेंबटे

पाटीवरची पेन्सिल भैय्या आणील
पाहून ज्योती खूश होईल

मैत्रिणीं मागतील कॅडबरी गोळ्या
ज्योती देईल चापट-पोळ्या

मामा म्हणतील कसला वाढदिवस
सगळे असतात कामाचेच दिवस

गुडघे चोळीत चिडवेल आजी
लग्नाला आली बाय माझी

मावशीची येईल कविता छोटी
फुलपाखरासारखी बागडेल ज्योती

शुभाशीष अनेक मिळतील तिला
जीवेत् शरदः शतम् प्रार्थना प्रभूला

# गारवा

गारव्यात झुले
मनाचा झुला
पानापानांत घुमे
गार वारा



झाड झाडोरा डोले
कानात बोले
आभाळ भेटले
न्हाऊन आले

कण कण फुले
सुगंध उधळे

झाडांची कळकळ
पिकांची सळसळ

आभळात झेपावे
हिरवी मखमखल

घुमत पारवा
गातो गीत

गुटर्र ऽ गूँ ऽ गुटर्र ऽ गूँ ऽ
गुणगुण गुंगीत

# काय करावे



सगळ्यांची असते
ताईच लाडकी
तिचेच कौतुक
म्हणे हुशार भारी

एकदा काय झालं
खूप भांडलो ताईशी
चिडून तिनं
कट्टी केली माझ्याशी

कसा बरं काढावा
रुसवा तिचा
रुबाब दाखवावा का
फाड्फाड् इंग्रजीचा

हिंदीतील काव्य
नक्की आवडेल
पण त्यातील
चुकाच काढीत बसेल

जाऊ दे त्यापेक्षा
न बोललेलं बरं
आणखीन चिडली तर
काय न्हाय खरं

# तरुलता

नाजूक सुंदर तरुलता
दवबिंदूमधे भिजूनी
थंडीत गोठणाऱ्या

तरिही येता बहरूनी



पावसाशी खेळ खेळता
चिंब चिंब भिजूनी
वादळी भोवंडणाऱ्या

तरिही येता बहरूनी

चांदण्याची शाल पांघरता
धुक्याचा घुंगट घेऊनी
शिशिरात पाने गळणाऱ्या

तरिही येता बहरूनी

ग्रीष्माचे चटके खाता
चैत्री कोवळीक पालवूनी
वसंत फुलवणाऱ्या

उन्हात येता बहरूनी

# चिंटूची बॅटिंग

उद्या मॅच, चिंटू सरावास गेला
सिक्सर चौकार ठोकत राहिला

कॅप्टन त्याचा खुश झाला
खांद्यावर हात ठेवीत म्हणाला

'उद्याचा सामना समज आपणच जिंकला
बॅटिंगचा मान तुझाच पहिला'

सामन्याचा दिवस उजाडला
चिंटू ऐटीत मैदानात उतरला

आधी लागू सिक्सर मारायला
चौकार नंतर येतील ठोकायला

पळत धावा नकोच काढायला
षटकार ठोकण्याचा ऐटीत उभा राहिला




गरगरत धडधडत चेंडू आला आला
पाहून त्या चेंडूला चिंटू गांगरला

काय झाले कळेचना त्याला
फिल्डरने त्याचा चेंडू अलगद झेलला

पहिल्याच चेंडूत पंचाचा हात वर गेला
चिंटू शून्यावर बाद झाला

# सालभर दिवाळी



दिवाळी संपली आकाशकंदिल काढू देईना
फटाके संपले तरी फराळ काही संपेना

ढीगभर लाडू न् चकल्या डबाभर चिवडा
कोणी खाईना की मलाच सारखे खा खा

दिवाळी खाऊन आलाय कंटाळा केवढा
कधी करेल झणझणीत सांबार वडा

शाळा सुरू होऊन अभ्यासाचा भार वाढला
आईनं लाडवांना नवीन प्रकार करू घातला

असली दिवाळी सालभर चालते
बाबांच्या खिशाला चाट पडते

माझ्या तर तोंडाची चवच जाते
आईची मग किरकिर सुरू होते

किती करते कष्ट तुमच्यासाठी
तुम्हाला मात्र किंमत नाही

# चांदोमामा



पुनव दुधाळली
आभाळभर फेसाळली

फेसात चमकतो लोण्याचा गोळा
इंद्रधनुचा रंगीत झोपाळा

झोपाळ्यात बसला चांदोमामा
या या खाली चांदोमामा

आम्हालाही द्या थोडा झोका
एकदा तरी मिळू द्या मोका

चांदोमामा हसतहसत लपले
ढगांच्या रथात जाऊन बसले

ढगांच्या रथ पळू लागला
ढगाला ढग जोडू लागला

# मनी बांधतोय घाट

शाळा सुरू झाली
नव्या पुस्तकाचं नावीन्य
महिनाभरात जुनं झालं
आता मिळवायला हवं प्रावीण्य

चाचणी आली कधी
अभ्यासाची भरली धडकी
कळलंच कसं नाही
अंगात आली कडकी

बाबांनी मात्र घेतलंय
डोक्याला टेन्शन भलंतच
अभ्यासाचं लावलंय टुमणं
तरी मन टी. व्ही. कडे वळतंच

टी. व्ही. बघता बघता
लागतेय झोप गाढ
सकाळी उठवत नाही
हाती धरवत नाही बाड

गणपती गेले...दसरा आला
सहामाही संपण्याची बघतोय वाट
दिवाळीच्या सुट्टीत कसा बांधायचा किल्ला
याचेच मनी बांधतोय घाट

# उल्केचा वर्षाव

आकाशगंगेत हिरे भरले खचाखच
पाणी वाहायचे झाले बंदच

जलदेवता रुसून बसली
तारांगणे काळजीत पडली

रुसवे यांचे काढायचे कसे
तुंबलेले पाणी वाहायचे कसे

सगळे गेले जलदेवाकडे
घातले त्यांनाच सर्वांनी साकडे

सांगा सांगा उपाय आम्हाला
कसे करावे मोकळे पाण्याला

आम्हा काही सुचेना
तुम्हीच मार्ग काढा ना

जलदेव म्हणाले हे हिरे एवढे
कमी करा थोडे थोडे

करा वर्षाव खाली नी वर
मोकळे होतील जलधर


वाहील गंगा खळाळत
चमकत लहरत हसत खेळत

# लोणार

झाला धुमकेतू पुढे
भरला पिसारा हिऱ्याने

विखरुन टाकी चहूकडे
भुमीवरी पडतात थोडे

घर्षणाने बरेच जळतात
उरलेले खालीच पडतात



होतो त्याचा फक्त दगड
जे धरतीवरही असतात रग्गड

पण हा दगड असे वेगळा
याच्यामुळे निर्माण होई हेळा

सुंदर शांत गोड जलसागर
हिरव्या कोंदणात मंद लहरे लोणार

उन्हात पाणाचे पैलू चमकतात
उल्केचे जसे हिरेच भासतात

# स्वप्नसुत

ओम वरद
वरदला आवडतो मोदक
चतुर्थीचा मोदक गोडधोड
बाळाची नजर शोधक बोधक


धोंडूचा कोंडू
कोंडूशी भांडतो दगडू
बोळकं हसतो धोंडू
रगडू दगडू झाले झगडू

डमडम वाजे डमरू
रुद्राचे तांडव सुरू
टणात्कार करतो अर्जुनाचा बाण
अकराव्यात पाचला झाला देदिप्यमान



# टिंकूची सायकल

टिंकूला आणली नवीन सायकल
चिंटूला म्हणाली करू सफर चल



ऐटीत बसली टांग मारून
चिंटूला घेतले मागे बसवून

चिंटूला काळजी वाटू लागली
टिंकूने कुठे सायकल पाडली

भीती वाटू लागे त्याला
सावध तो करू लागाला

पुढे खेळतात बघ मुले उभी झाडे
येतात गाड्या जाती हातगाडे


अरे चिंटू आधी बस पाहू
अडचणीचे गाणे नंतर गाऊ

नको रे बाबा डबलशीट
व्हावं लागेल दवाखान्यात ॲडमीट

चिंटूने मारता उडी मोडले पेकाट
टिंकू पळाली धूमचकाट

# काजवे

घाटातील झाडी दाट
नागमोडी वळणाची वाट
अंधारी काळी किर्र ऽ रात
चांदण्याची दाटी आभाळात



लुकलुक पाहत धरतीवर
काय चमकते अवनीवर

अंधारातले हिरे पळतात कसे
कळेना काय चमत्कार असे

झाडावर लगडणारे दिवे जसे
झुंडीने इकडून तिकडे धावतात कसे

पृथ्वीवरचे छोटेसे चांदवे
अंधारातील जंगलांना सजवे

निसर्गाची जादू फिरवे
दीपोत्सव करिती.काजवे

# घे तू थांग



चौखूर उधळू दे
ज्ञान लालसेचे अश्व
पादक्रांत कर हे
जिंकुनी सारे विश्व

अपरंपार घे कष्ट
शिकुनी हो महान
जन्मदात्याची नजर
होऊ दे लहान

भरारी मारताना
अचाट कर्तृत्वाची
नको विसरू रे
खूण मातीची


आशिष हे ज्यांचे
असतातच नेहमी
आठवण ठेव रे
त्यांची अंतर्यामी

जन्मजन्मांतरीचे
फेडुनी पांग
ज्ञानाच्या अवकाशाचा
घे रे तू थांग

# सुवर्णपदक

ऑलिंपीकमध्ये जाईन
सुवर्णपदक मिळवीन

स्वप्न माझे आहे खरे
सांगताच हसतात सारे



ताई म्हणते तोऱ्यात
मुलीच पुढे साऱ्यात

आई म्हणते कशी
भारतीय सगळे आळशी

भारत मार खातो वशिल्यात
गुणीलोक मागे पडतात

बाबा बोलतात मोजके
पर्यावरण सांभाळून मिळवा पदके

# मामाच्या गावाला

उन्हाळ्याची सुट्टी
मामाच्या गावाला

खेळून-मळून काव आणला
आजोबा-आजीला

गोड द्राक्षे थंड रसाळ छान
ऊसाचा रस मामा घेतात पारखून

काकडी-कैरीला तिखट मीठ भरपूर
दुधाला असतो फाटा पहिल्यापासून


आईसकॅण्डी कुल्फी चोकोबार
बर्फाचा गोळा गाडीवर

खाण्याची असते चंगळ
कामाची मात्र टंगळमंगळ

मामाच्या खिशाला
बसते मोठी चाट

मुलांचा असतो तरी
जोरात थाटमाट

# नवे युग



पहाट ही नव्या युगाची
चाहूल यंत्रमानवाची
सर्जन दिशा प्रगतीची
व्यापून टाकी जीवनाची

टिपण टाचण पाठांतर
पटपट करी कॉम्प्यूटर

नाही अभ्यास नाही शाळा
कॉम्प्यूटरवरती माहिती मिळवा

नाही खरेदीला जाणे
नको मंडईत हिंडणे

इंटरनेटवर ऑर्डर देणे
घरपोच पार्सल घेणे

पुस्तकांचे नाही प्रदर्शन
संगणकावर करा वाचन

नसे आता चिंतन मनन
डिस्कमध्ये होई माहितीची साठवण

# इवलेसे घरटे

भिरभिरे कसे पाखरू
इकडून तिकडे उडे

घरट्यासाठी

शोधी चिमणी


अडगळ मग

तिज सापडे

कोनाड्याच्या या जागी
काडी काडी येऊन पडे

पाहून कुतुहल होई जागे
चिमुकल्या जिवाची लगबग चाले

सर्वांना ही गंमत सांगे
आता बांधील घरटे इवले इवले



इवल्याशा त्या घरट्यामध्ये
घालील इवलेशे अंडे

नव्या जिवाच्या स्वागतासाठी
चिमणी ही धडपडे

# आत्याचा वाढदिवस



आज वाढदिवस असे आत्याचा
जल्लोष सगळ्या सोसायटीचा


मयुरीने आणले रंगीत फुगे
आत्या त्याच्याशी खेळू लागे

वैनीने आणला केक चवदार
आत्या पाहून हसल्या झोकदार

महिला मंडळाने दिली झिरमिरी साडी
आत्याने मारली आनंदाने उडी

डॉक्टरकाकांनी आणली फुलांची परडी
आत्या लाजून मान मुरडी


आत्याचा वाढदिवस चाळीसावा
आत्या म्हणे जरदोजीचा ड्रेस शिवा



मुलांनी केला दंगा
मुलींनी चिडवून पंगा

आत्या म्हणजे चैतन्याची खाण
नव्या राजवाडा परिसराची शान

# अभ्यासू



दोन्ही कानाजवळ दोन घड्याळे
गजर त्यांचा लावून ठेवतो

आता तरी येईल जाग म्हणतो
पहाटे अभ्यासाला उठतो


पहिल्या पाचात नक्की येईल
असं आता तरी म्हणतो

परिक्षेत प्रश्न जाता अवघड
ऐंशी टक्केच पडतील सांगतो

अभ्यास करताना वाटतं
छान अभ्यास करतो


कशाने काय होतं
पहिल्या पाचातही नसतो

# रोहितची दुर्बिण



शेजारी बागेत आंब्याचे झाड
करकरीत कैऱ्यांनी लगडले

अर्जुन रोहित कान्हाच्या
तोंडाला पाणी सुटले



आधी पाहणी टेहळणी
नीट हवी करायला

त्यासाठी शक्तीमान दुर्बिण
तात्यांना सांगू आणायला

वशिला लावला माईकडे
पक्षीनिरीक्षण करेल पोर

द्या त्याला दुर्बिण आणून
आकाश निरीक्षणाने होईल थोर

तात्यांनी मग आणली दुर्बिण
जरी खिशाला बसली चाट

रोहित बसला टेहळणी करीत
काय वर्णावा त्याचा थाट

कुठे कुठे लागल्या कैऱ्या
पाहून साऱ्या लक्षात ठेवल्या

मित्रांना घेऊन भराभर तोडल्या
तिखट मिठ लावून पोटभर खाल्ल्या

# का?

कोण म्हणतं झाडाला
सदा तू राहा वाढत
ऋतुबरोबर बदलत
पानगळ करीत करीत

वसंतात राहा बहरत
ऊन पाऊस सोसीत
खोलवर मुळे रुजवीत
राहा सावली देत

कोण सांगते पक्षाला
तू जमव काडीकाडी
बांध घरटे पिलांसाठी
घेई त्यांनी गगन भरारी
निभवायला हवी जबाबदारी

कोण सांगते प्राण्यांना
पायात येईतो बळ
छोट्या पिलांना सांभाळ
प्राणाची बाजी लावून
करा त्यांचे रक्षण

माणसाला मात्र
सगळेच सांगावे लागते

शिकवत शिकवत
घडवावे लागते
का? ? ?

# सुट्टी



परीक्षा संपली सुट्टी लागली
करू धमाल मिळून सगळी

झाडावर चढून कैऱ्या तोडू
आंबटतुरट कराकरा फोडू

जोतीबाच्या डोंगरावर चढून जाऊ
जाता जाता करवंदं खाऊ

दुध दही खाऊन धष्टपुष्ट होऊ
सायकल चालवून पेट्रोल वाचवू

घालू सूर्यनमस्कार अन् जोर बैठका
फोडायच्या मग तुपातल्या खारका

दुपारच्या वेळी वाचू गोष्टी गोड
टी. व्ही. चं ठेवू ज़रा बाजूला वेड

भेळपुरी पाणीपुरी पचवू दाबेलही
त्यासाठी पिळदार बॉडी हवीच झालेली

अशी घालवू सुट्टी सारी
गुणांची वाढेल टक्केवारी

# माझे बांधव

नाहीत मला भाऊ-बहिणी
म्हणू नकाच असे रे कोणी

आश्रमातले बालक सारे
बंधू-भगिनी माझेच खरे

बांधीन राखी या बांधवांना
ओवाळीन मी भाऊबीजेला

आली पंचमी मेंदी रंगेल
त्यांच्या संगती झोका खेळेन

गणपतीला गौरीच्या सणा
घरी घेऊन येईन त्यांना

अंध मित्रांना दिसत नाही
वाचून त्यांना दाखवीन मी

माझे बांधव नाहीत अनाथ
सुख वाटीन मी त्यांच्या दु:खात

# पाणी अडवा पाणी जिरवा

कोटी कोटी टन
वर्षतात घन
करू नका धन
सागराची

पाणी रे अडवा
वीज मिळवा
जगणे उंचवा
गरिबांचे

कशाला रे हवा
सरकारी टेकू नवा
पाऊस जिरवा
चर खोदूनी

भिजेल धरती
फुलेल शेती
तळी विहिरी वाहती
थांबवा वणवण

नका दवडू वेळ
बरा आहे पाऊस काळ
जगवा वड -पिंपळ
मुळांशी राहील पाणी

# संत गाडगेबाबा



असामान्य साधेपणा
पुरेपूर भरलाय
व्यक्तिमत्त्वात अन् शब्दात
चिरंजीव अमृत झरती

त्यांच्या भावात
ज्ञानाचे अखंड पाझर
वाहतात तृषार्ताकडे
घ्या ओंजळीने भरभरून

घालवा अज्ञान तहान
कृती काम हाच उपदेश
रस्ते झाडीत झाडीत
मने सर्वांची साफ करीत

डांगोरा न पिटता
मनामनातला कचरा

साधुत्व मनाचे
साधेपणाचे प्रतीक मातीचे गाडगे

डेबूचा झाला मग गाडगेमहाराज
मागून जेवले फक्त गाडग्यात

जागवले जगाला
जनकल्याणार्थ खर्चले
उभ्या आयुष्याला

# झाडांना ओढ आकाशाची





गच्च हिरव्या पानांतूनी
डोकावते हळूच कुणी

उमलले फूल वेलीवरी
हरखून झाले नाचरी

नाजूक पाकळ्या गडद गुलाबी
पिवळे पराग डोले मधोमधी

नसे वेडावणारा गंध जरी
असे रंग हा नयनमनोहारी

धडपड त्यांची झेलण्या रश्मींना
पानांचा हा अडसर सरेना

आच त्यांना राहे प्रकाशाची
ओढ झाडांना आहे आकाशाची

# घरकाम

स्वयंपाक होत नाही झटपट
पोराने लावला भाताचा कुकर

प्रोग्राम करून देतसे आईला
बाळ शिकून आला कॉम्प्यूटर

दप्तर आवारायचं सोडून
भांडी लावायला आत आला

गप्पा गोष्टी करी तो आईशी
इस्त्री करायला नको त्याला

घरकामाची हौस भारी
फोडणी टाके पोह्याला

सर्वांचा गाळतो चहा
बिस्कीट भरवतो आईला


पाठीवरचे ओझे सावरत
शाळेत जातो बसने

शांत सारे झाले घर
आईचा जीव हुरूहुरू लागे

पडू आजारी वाटे आईला
सेवा करी गुणाचे लेकरू

हेच औषध लागू पडे
आई म्हणे माझं मायेचं कोकरू

# गोगलगायीचे पंख



कष्ट करा धीर धरा
नाही कुणाला अपाय

इच्छाशक्तीने घडले चमत्कार
नाही कष्टाला पर्याय

जिद्दीचे जगणे ठाम चाल
गोगलगायीलाही लागतात पंख

महत्त्वकांक्षेची गगनभरारी
गळाले पाठीवरचे शंख

थांबू नकाच डोके चालवा
चालणाऱ्यांचे नशीब चाले

ध्यास श्रमाने घडता भविष्य
कपाळीचे भाग्य बोले

# ...साध्य करू...

निळाईवर फुटलं तांबडं
ऊठ सानुली ऊठ राजा

झटकूनी आळस सारा
साखरझोपेची सोडा मजा

साफ-स्वच्छ होऊनी मग
घाला सूर्याला नमस्कार

दोरीवरच्या उड्याही भराभर
होई संपन्न आरोग्याचा साक्षात्कार

करुनी अभ्यास एकचित्ताने
हसतमुखाने मदत आईला

शाळेमध्ये हिरीरीने खेळ खेळा
हेच असे संवर्धन बुद्धीला

सर्वांशी करा निकोप मैत्री
सगळ्यांना मदत निस्वार्थी

हे विश्वची माझे घर
साध्य करू खऱ्या अर्थी

# चांदणी दिवे

एक गाव घराच्या मागे
नाव त्याचे वडंगे

टेकडीवरचे सुंदर खेडे
रस्ते तिथले वेडे -वाकडे

हिरव्या गर्द झाडांत
उंच उंच माडांत

कौलारू घरे लहानखुरी
देवळाचे शिखर उंचभारी

दिवसा उन्हात चमकते
सगळेच शांत भासते

रात्र होताच लागतात दिवे
चांदण्याची रांग मनाला भावे

दाट काळोखात उजेड शांत
आम्ही आहोत म्हणे झोपा निवांत

सुर्याला पाहाताच वंदन  करुनी
विसाव्याला जातात निघूनी

# आजीच्या वेळी

काय दिवस आलेत
सगळीकडे रांगा न् पाळी

आमच्या वेळी
अस्सं नव्हतंच मुळी

दह्यादुधाच्या
भरलेल्या चरव्या

आता मिळतात दुकानात
लिटरच्या पिशव्या

लोण्याचा गोळा
ज्वारी- बाजरीच्या भाकरीवर

आता लावतात
बटर पावा- ब्रेडवर

भरलेल्या घरात
गजबज पाहुण्या रावळ्यांची

आता सरबराई चालते
कुत्र्या मांजराची

ऊबदार मऊ चौघडीवर
खरखरीत घोंगडी

बिनवजनाच्या
रजईची भलीमोठी घडी

उन्हानं रापलेली कणखर
निरोगी आमची कातडी

आता बाई आरपार
सोनेरी वडी

आमच्या वेळी
अस्सं नव्हतंच मुळी

अंगणात रोजच
सडा न् रांगोळी

आता पारोशानंच
चहा घेतात

सकाळी सकाळीच
टी. व्ही. पुढे बसतात

आरसे तर काय होते
आमच्यावेळी

गालावरचे गुलाब
बघून व्हायचे खुळी

आताच्या आरशाचं
कसं होईना काळं

सारखं मेलं दिसतंय
सुरकुत्यांचं जाळं

# माझे आजोबा



आजोबांना द्यावा लागतो दोरा
ओवून सुईच्या बारीक नाका
मग शिवतात बटण
गाठ मारून घालतात टाका

आजोबांचे पाठांतर अजब
अजून म्हणतात पाढे खाड्खाड्
अभंगासोबत औटकी निमकीची
परेड असते ताड्ताड्

आजोबा आमचे विसरभोळे
नावेही राहत नाहीत लक्षात
ठमा यमा सकू ठकू म्हणतात
बसा गं सगळ्या झोपाळ्यात

आजोबा आमचे कानाला टोपी
अंगावर पडशी गुंडाळून बसतात
थरथरत्या हाताने
कोपरीतच्या खिशातला खाऊ देतात

# पृथ्वीचे मनोगत

वसुंधरा मी पाहा
झाली विद्रुप असुंदर
प्रदुषणाच्या विळख्याने
वाढली माझी गुदमर



हवा ही धुरकट
सजीवांना करी जर्जर
अति वापराने अस्वच्छ पाणी
प्राण्यांचे वाढते आजार

उपाय हा करुनी पाहा
माणसांच्या बालकांनो
रोपे लावून जगवून सजवून
जमिन हिरवी करा रे मुलांनो

नका रे इंधन जाळू
सायकल वापरा विद्यार्थ्यांनो
नदी नाले राखा रे स्वच्छ
प्लॅस्टीकचा वापर टाळा मित्रांनो

झाडे लावून गार सावलीत
अभ्यास तुम्ही करीत बसा
ए.सी.चा करताना वापर
ओझोनचा थर होतसे पातळसा



जाणीव याची ठेवा माठ घ्या
फ्रीज बंद ठेवा जरासा
ताज्या भाज्या कच्च्या खा
इंधन वाचवून आईला द्या विसावा थोडासा

पाणी वाचवा वीज वाचवा
इंधन वाचवा सांगा सगळ्यांना
कृतीतून साधेपणाचा प्रसार करा
शिकवा लहानांना अन् थोरांना

नका ओरबाडू नका शिणवू
रे माझ्या भावभावनांना
एकविसाव्या शतकातील नागरिकांनो
नका टाळू निसर्ग नियमांना

कोपला निसर्ग फाटले आभाळ
कसे रे जोडाल आभाळाला ठिगळ

# आपलंच झोपडं बरं...



सगळेच खेळतात चेंडू फळी
झुलतात डुलतात झोपाळ्यावरी
हसतात इकडे तिकडे लपतात
चालते त्यांची धराधरी

मला वाटेनाच खेळावे
तूच दिसते डोळ्यापुढे
तुझा दुरावा सोसवेना
आई तुझ्याविना करमेना

तू जातेस जरी कामाला
राहीन गं एकटाच झोपडीत
ठेव तुझ्याच जवळ मला
रात्रीचा तरी झोपेन तुझ्या कुशीत

रोज तुझ्या हातचा घास
खाईन मी सुका शिळा
मन लावून अभ्यास करीन
खूप शिकेन शाळा

सुधारगृह नको गा हे
कळतंय आता आपोआप
आपलंच झोपडे बरं आहे
नाही देणार तुला ताप

# दवबिंदू

बागेत एका फुले फुलली
लाल निळी पांढरी पिवळी

आकाशातून पाहिले एके दिवशी
नाजूक परीने फुले ती सुंदरशी

हसत खेळत अवतरली अवनीवरती
उडत बागडत सगळीकडे ती होती

रोज रोज येत राही ती बागेत
परिच्या सख्याही आल्या रांगेत

इकडून तिकडे दंगामस्ती
खेळ रंगला लपाछपी

काळवेळाची त्यांना नाही तमा
रात सरली मावळला चंद्रमा

गुलाल उधळला प्राचीवरती
पऱ्या आल्या मग भानावरती
निरोप त्या फुलांचा घेताना
दूरदेशी सोडून त्यांना जाताना

आसवांचे मोती ओघळले
पानांनी अलगद झेलले
गेल्या दूरदूर पऱ्या
झाल्या अदृश्य त्या साऱ्या

आसू राहिले मागे पानांवरती
तेच तर दवबिंदू असती

# स्वप्नाळू डोळ्यांचा दादा

आम्हीच आपले रोज
शिकतो इथे खेळतो
इथेच खातो झोपतो

बाहेरचं कोणी येत नाही
नाही कुठे जात आम्हीही
लग्न वाढदिवस बारशी
ठाऊक नसते आम्हा काहीही

एक दिवस असा उजाडला
कोणी स्वप्नाळूपणा डोळ्यात लेवून आला
आमच्यासाठी नवीन चेंडू आणला
खूप मजेने खेळला

पोटभर गप्पा मारल्या
असं वाटलं...
हा आमच्यातच राहिला तर...
जाताना म्हणाला दादाच रे तुमचा
पुनः पुन्हा येईन
येताना काय आणू सांगा
'फुटबॉल'
सर्वांचा एकच आवाज
लाथा हाणायच्या होत्या
परिस्थितीवर अन् उगवणाऱ्या दिवसावर
रोज वाट बघणं सुरूच आहे ...

स्वप्नाळू डोळ्यांचा दादा
फुटबॉल घेऊन नक्कीच येईल
...नक्कीच...
मग खूप खेळायचं...
खूप...खूप...खेळायचं...
सुधारूनच या सुधारगृहातून जायचं

# सणासुदीचा वर्षाव

वसंत बहरला आंबा मोहरला
चैत्रगौरीच्या पन्ह्याचा थंडावा निराळा

वैशाख वणव्यात गाव गाव फुलले
जत्रायात्रांतून नात्यागोत्यांचे भेटले

वळीवांच्या सरींनी मृदगंध दरवळा
लग्न वाजंत्रींनी आसमंत निनादला

जेष्ठातल्या लग्न वराती
लाडू जिलेबीने पोट आले वरती

आषाढात कोसळले आभाळ
झाली धरती न्हाऊन निर्मळ

ओल्या श्रावणी गंधाने झाली धुंद
चिपकले हिरवाईचे वस्त्र हिरवं कंच

दुथडी भरून धावतेय नदी
सागर भेटीची तिला ओढी

निंबा पिंपळाला पंचमीचे झुले
नवतीचा पिंगा हिंदोळ्यावर घुमे

पानाफुलांच्या मखरात मंगळागौर रंगे
आघाडा हरळीने गौर गणपती सजे

सणासुदीचा वर्षाव मनामनात हर्ष
ओल्या हिरव्या ताजव्यात सरते वर्ष

# चांदण्यांचं राज्य



एक हिंदोळा आभाळाला
भला मोठा ढगांचा झुला

त्यात बसला चांदोबा
अरे बापरे तोबा तोबा

केवढा तरी घेतला झोका
चांदण्यांना दूरदूर हाका

पळाल्या लांबलांब भिऊन
चांदोबा हसला त्यांची फजिती पाहून

चांदण्या चिडुन बोलल्या
'काय उच्छाद मांडलाय रे आज

कधीतरी येईन
आमचंही राज'

ऐकून चांदोबा हिरमुसला
आकार त्याचा कमी होत गेला

अमावास्येला तर
दिसेनासाच झाला

शहाण्या चांदण्या घाबरल्या
सगळ्या साऱ्या चुकचुकल्या

'ये रे ये रे चांदोबा
तुझ्याशिवाय नाही शोभा'

विनवलं चांदण्यांनी चांदोबाला
चांदोबा मग खूश झाला

प्रथमेची दिसली कोर
चांगण्या झाल्या बिनघोर

आभाळभर लुकलुकल्या
पुनवेची वाट पाहू लागल्या



# लेकीची दहावी



आली गं बाई दहावी आली
लेक माझी अभ्यासात बुडाली

टी. व्ही. सिनेमा न्हाय बघायचा
खेळ न्हायी न्हाय फिरायचं

नुसतं पुस्तकात डोकं खुपसायचं
कामाचं तर नावच न्हाय घ्यायचं

जादा तास आणि शिकवण्या
चाचणी परिक्षांच्या पाठशिवण्या

दिवस तिला पुरत न्हाय
रातीची नीट झोपत न्हाय

कर कर करते घोकंपट्टी
सोडविते प्रश्नप्रत्रिकांची थप्पी

दहावी आली गं दहावी आली
लेक माझी अभ्यासात बुडाली

# परीक्षा



आली आली परीक्षा
अभ्यास जागरणाची शिक्षा

वेळेच्या आखल्या कक्षा
टी. व्ही. पासून होऊ दे रक्षा

कितीही केला अभ्यास
राहतच नाही लक्षात

कुंबळेचा चेंडू गरगरत येतो
सचिन षटकार चौकार ठोकतो


हेच दिसते ध्यानात
लक्ष लागेना वाचनात

गुण पडतील नव्वद टक्के
बाबा म्हणतील कुठे गेले दहा
टक्के

आई म्हणेल हुशार माझं बाळ
पुढच्या वेळी पहिला नंबर काढ

मग मिळेल रिमोटची गाडी
नाहीतर आहेच कागदी होडी

# मामाला माझ्या



कावळे सारे बसतात
वीजेच्या तारेवर
तिथेच त्यांची शाळा
गुरूजी बसतात खांबावर

काव काव करूनी
म्हणतात कविता गाणी
आणखी सगळ्यांना
घेतात बोलावूनी

आमच्याही घरावर
करा ना रे काव काव
मामाला माझ्या
लवकर बोलाव

मामाने आणलेला खाऊ
तुलाही थोडासा देऊ

# उठा ऽ उठा ऽ रे

जुनाट कोषातून बाहेर पडू
बुरसटल्या लक्ष्मणरेषा ओलांडू
क्षितीज नवे धुंडाळू
कल्याणाचा मार्ग चोखाळू
उठा आनंदाने आपण जगू

निराशेचा अंधार संपवू
पहाट आशेची लागेल डोकावू
नवविचारांचे किरण लागले उजळू
उठा आनंदाने आपण जगू

सत्याला जाऊन भिडू
दाहकतेचे घोट घेऊ ते कडू
नको अडचणीचे हे रडू
उठा आनंदाने आपण जगू

आत्मशक्ती आणखी वाढवू
धैर्याचे शस्त्र परजू
संकटांचे पर्वत परतवू
उठा आनंदाने आपण जगू

अभिरुची संपन्न करू
माणुसकीचं नातं सर्वां शिकवू
भेदभावाची दरी संपवू
उठा आपण आनंदाने जगू

# जय शिवाजी



मिळवूनी स्वराज्य करीन सुखी प्रजा
बोलला तो शिवाजी राजा
शिवमंदिरात केली घोर प्रतिज्ञा
पाळली मावळ्यांनी राजांची आज्ञा

आपण सगळे होऊ एक मराठे
जुलमी जहागीरदारांचे घालवू ताठे

तोरण्यावर करू चाल आखले धोरण
जिंकूनी गड स्वराज्याचे बांधले तोरण

गडावरचे हाकलले परके डोमकावळे
लढता लढता कामी आले कितीयेक मावळे

प्राणाची बाजी लावूनी लढविली खिंड बाजीने
लगीन ठेवूनी बाजूला कोंढाणा लढविला तानाजीने

मानला एकेक मावळा मोठा गडाहूनी
रयतेला लावला जीव लेकरावाणी

आली संकटामागूनी संकटे किती
तरी नाही डगमगले छत्रपती

नाही कुणाची त्यांना वाटली भीती
सावध राहीले समजूनी साऱ्या वैऱ्याच्या राती

तह करताना गड किल्ले अनेक सोडले
संधी मिळताच प्रदेश पुन्हा जिंकले

शत्रुला केली पळता भुई थोडी
गनिमी काव्याने जिरविली त्यांची खोडी

अफजलखानाचा वाघनख्यांनी काढला कोथळा
चकवूनी सिद्दीला सोडला पन्हाळा

लाल महालातल्या खानाची कापली बोटे
पळाला दिल्लीला हा मामा घेऊनी हात थोटे

निसटले राजे फकीरांना वाटूनी आग्र्याचे पेठे
लुटले सुरतेचे खजिने सोन्या – मोहरांचे साठे

मराठ्यांचा राजा झाला शिवछत्रपती
पाहूनी राज्याभिषेकाचा सोहळा डोळे दीपती

नेमले चोख ते अष्टप्रधान मंडळ
दिगंत किर्तीने दुमदुमले भुमंडळ

बादशहा औरंगजेबाचे तख्त थरारले
निजाम आदिलशहाचे सरदार गांगरले

जय जय तुळजाभवानी माते
तुझ्या सुपुत्राचे गान ही दुनिया गाते

दोन वर्षाचा असताना माझ्या मुलानं विचारलं होतं,
"तांबडं फुटलं म्हणजे काय?"
त्या नंतर दहा वर्षांनी मी कविता लिहिली, म्हणजे मला सुचली
'सकाळ' ५/१२/१९९९ मध्ये ती प्रसिद्ध झाली.

'सांग ना आई
तांबडं फुटलं म्हणजे काय?
सूर्य उगवताना पहाट लाजते
गाल तिचे होतात लालेलाल
तिरक्या किरणांतून उगवतो गुलाल
सृष्टी होते केसरीलाल'

असं कधी कधी बीज पडतं आणि कधी रुजतं सांगता येत नाही.
आपलं मन मात्र निस्वळ, सजग, असावं.
निर्मितीच्यावेळी संवेदनशील निर्मिती होतेच

सावित्री जगदाळे



लोकसंस्कृती प्रकाशन